
म. ग्रं. सं. ठा

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.

BVBK-0404553



खूप वाचा
खूप शिका

...१०...

# सुंदरवाडी

विठ्ठल वामन हडप

अनुक्रम ........
विभाग
क्रमांक
नोंद दि.
वाचनालय शाखा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ........ नों. दि. ..........
वि. ..........

BVBK-0404553

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य दहा आणे

पहिली आवृत्ति : १९५४

चित्रकार
प्रभाकर गोरे

ब्लॉक्स
कर्नाटक प्रोसेस स्टूडियो

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
के. मि. ढवळे
कर्नाटक हाऊस
चिराबाजार, मुंबई २

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वा. .ालय शाखा


# मित्र हो!

तुम्हांला लिहायला वाचायला येऊं लागलें.
तुमच्या गांवांत काय चाललें आहे
तें तुम्हांला गांवीं असलेल्या माणसांच्या
पत्रांवरून समजूं लागलें.
शहरांत, राष्ट्रांत, जगांत काय चाललें आहे
हें वर्तमानपत्रांवरून समजूं लागलें.
पण आणखी कांहींतरी तुम्हांला समजायला हवें आहे.
तें आणखी कांहींतरी समजायला शिक्षण हवें.
शिक्षण पुष्कळ प्रकारचें आहे.
तें वाचून मिळवायला हवें.
आपल्या सुंदरवाडीचा शिवराम, शंकर, खरे मास्तर,
रावणशेट ह्यांनीं शिक्षणासाठीं किती कष्ट केले पहा.
काय काय केलें? वाचूनच पाहा ना पुढें....

**विठ्ठल वामन हडप**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | मुंबईंत | ५ |
| २. | सात वर्षांनंतर | १० |
| ३. | इस्पितळांत | १४ |
| ४. | मास्तरांचें काम | १८ |
| ५. | चाळींतलें गांवराज्य | २२ |
| ६. | ह्याला म्हणतात गांवकी! | २६ |
| ७. | कांहीं दिवसांनंतर | २८ |
| ८. | भुतांच्या चुडी | ३० |
| ९. | सुंदरवाडी | ३५ |



अनुक्रम ९५०२ विभाग

# १. मुंबईत

भोंओंऽऽ ! भोंओंऽऽऽऽ !

बोटीनें बंदर आल्याची सूचना दिली. पारू एकदम दचकून जागी झाली. बोटींत आंथरुणावर उठून बसते आणि पाहाते तों सभोंवार समुद्र पसरलेला आणि पलीकडे दूर लांबचलांब दिव्यांचा लखलखाट.


बोटींत एकीकडे पारू, तिच्या शेजारीं शिवराम आणि शिवरामच्या शेजारीं त्यांचा पंधरा वर्षांचा मुलगा शंकर, तिघं खालच्या वर्गाच्या गर्दींत दाटीवाटीनें झोपलीं होतीं.

" मुंबई आली वाटतं ! " शंकर जागा होऊन समोर पाहून म्हणाला.

तोंच अमळशानें उजाडलें आणि बोट भाऊच्या धक्क्याला लागली.

" आतां आपणाला उतरायचं. " शिवराम गोणपाटांत बांधून आणलेला बोजा उचलून माथ्यावर घेतां घेतां पारूला म्हणाला.

कोंकणच्या लहानशा रावणगांव खेड्यांत आजवर जन्मापासून तीस वर्षं लहानाची मोठी झालेली पारू. कोंकणांत नीटपणें पोट भरत नाहीं म्हणून, नवरा एकटा मुंबईला राहातो त्याचेही हाल होतात म्हणून, आणि लेकही पुढें शिकायला हवा म्हणून, ती त्यांच्याबरोबर मुंबईला आलेली.



पारू आज प्रथमच मुंबई पाहात होती. तो समुद्र, ते धक्के, त्या बंदरांत नांगरून पडलेल्या कितीतरी बोटी, ती कुलाब्याची दांडी, त्या मुंबईतल्या मोठमोठ्या हवेल्या, नजरेच्या एका भरारींत तिला सारें समोर उभें दिसत होतें.

आणि अजून न दिसलेल्या मुंबईतील कितीतरी गोष्टी तिनें ऐकलेल्या मनांत घोळत होत्या. ती चौपाटी, ती राणीची बाग, ती ट्रामगाडी, ती बस, व्हिक्टोरिया, विजेच्या आगगाड्या, असें कितीतरी नुसतें तिच्या मनांत घोळत होतें.

आणि आतां मुंबईला उतरायचें, बिऱ्हाडीं जायचें आणि कोंकणांतील बारा वर्षांच्या संसारानंतर नवा संसार एका खोलींत सुरू करायचा.

"कसं भागेल आपलं सारं लहानशा एका खोलींत?" असे विचारांमागून विचार तिच्या मनांत घोळत होते.

तशा स्थितींत सामानाची ट्रंक शंकरकडे देऊन आणि वळकटी डोकीवर घेऊन ती शिवरामबरोबर धक्क्यावर उतरली. तेव्हां भांबावल्या-सारखी तिची अवस्था झाली होती. नाना प्रकारचीं माणसें येतांना जातांना तिला डोळ्यांपुढें दिसत होतीं. जो तो आपल्या गर्दींत. कोणाला कोणाशीं दोन शब्द बोलायलाही फुरसत नाहीं.

"आपल्या चाळींत किती बिऱ्हाडं आहेत?" बोटीच्या फलाटावरून धक्क्यावर उतरतांना शंकर बापाला म्हणाला.

" पुष्कळ आहेत. आतां दिसतील कीं ! " शिवराम म्हणाला आणि चालूं लागला.

तोंच गर्दींत चोर चोर म्हणून ओरड झाली.

एका खिसेकापूला चोरी करून पळतांना लोकांनीं पाहिलें. पकडायला धावले. पण तो सापडला नाहीं.

" अशा हातोहात चोऱ्या होतात मुंबईंत. नीट सांभाळून चालायला हवं. " शिवराम पारूला म्हणाला.

पारू अधिक सावधपणानें भीत भीत चालूं लागली.


त्या गर्दींतून अंग चोरून चालतां चालतां पारूला पुरेवाट झाली. तिला वाटे, आपल्या अंगाला कुणाचा धक्का लागूं नये. विशेष करून पुरुषाचा. पण तें सतत कसें जमावें ?

" आपणाला आतां बसमधून जायला हवं परळला आपल्या चाळींत. " शिवराम म्हणाला.

पारूचें तिकडे लक्ष नव्हतें. समोर रस्त्याच्या बाजूला माणसांची मोठी रांगच रांग उभी असलेली तिनें पाहिली. तिला वाटलें, इतकीं लोकें बायका, पुरुष, मुलें देखील कशाला रांगेंत उभीं राहिलीं आहेत हीं ?

" गर्दींत माणसाला बस गांठायला फार त्रास पडतो. अशी रांग लावून उभें राहिलें कीं हारीनें सगळ्यांना गाडींत जागा मिळते. धक्काबुकी आणि चेंगराचेंगरी होत नाहीं. अशा रांगेला 'क्यू' म्हणतात. ध्यातांत ठेव. " शिवराम पारूला म्हणाला.

तोंच परळला जाणारी बस येऊन उभी राहिली. रांगेंतले लोक हारीनें




आंत चढूं लागले. बसमध्यें शिवराम, शंकर आणि पारू, तिघांनाही जागा मिळाली. बोजे बसमध्यें ठेवून तिघेंही आंत बसलीं. बस चालली.

परळला चाळीजवळच रस्त्यावर बसचा थांबा होता. तेथें बस थांबली. तिघें खालीं उतरलीं. बोजा डोकीवर घेऊन चाललीं. चाळीचा जिना चढूं लागलीं. पहिल्याच मजल्यावर नळापाशीं शिवरामची खोली होती.

जिना चढून जातांना जिन्यांत लोक थुंकलेले आणि विड्यांचीं जळकीं थोटकें टाकलेलीं पाहून पारूला किळस आली. तशीच शंकरलाही.

तोंच पहिल्या मजल्यावरील एका बाईनें खोलीच्या दारांतला केर केरसुणीनें लोटला. लोटला तो नेमका जिन्यांत.



"शीः! एवढं देखील ह्या लोकांना कळत नाहीं? आपण थुंकलं, घाण टाकली, कीं लोकांनाही त्रास आणि आपणालाही त्रास." पारू त्रासानें म्हणाली.

खेड्यांतली खरी ती. पण सुधारलेल्या रावणगांवांतली. रावण-गांवची सुधारणा करणारे तेथले दिगंबरपंत खरे मास्तर. त्यांनीं शिकवलेले स्वच्छतेचे, टापटिपीचे धडे पारू विसरली नव्हती.

"आपण सुधारायला हवी आपली चाळ." शिवरामनें खोली उघडतांच आंत जातांना पारू म्हणाली.

प्रथम शिवरामनें नाक्यावरच्या भय्याकडून दूध विकत आणलें. शेजारून कळशीभर पाणी मागून आणलें. पारूनें अगोदर चहा केला. तिघेंही प्यालीं. नंतर दोघांचाही तो सारा दिवस जेवणखाण करून खोली लावण्यांत गेला.

त्यांतच आणखी नळावरचें भांडण. पारूनें नळावर पाणी आणायला गेल्यावर पाहिलें, एक बाई भांडते आहे. बाकीच्या बायका गप्प आहेत.

"सगळ्या चाळींत मुलखाची भांडखोर आहे बाई ती. तिच्या नादीं चाळींतलं कुणी लागत नाहीं. तिच्याशीं कुणी बोलत चालत नाहीं. भितात सारीं. तूंसुद्धा सांभाळून वाग तिच्याशीं. उगीच कटकट नको." शिवरामनें तिला हळूच सांगून ठेवलें.

पारूला नळाच्या पाण्याची गंमत आणि सोय वाटली. त्या भरांत ती भांडणाचा त्रास त्या वेळेपुरता तरी विसरली.

एवढें मात्र म्हणाली, "माणसांत राहायचं, मग मिळून मिसळून नको राहायला? असे भांडणतंटे करून कसं चालेल?"

शिवराम म्हणाला, "खरं. पण तें कळेल तर ना! बरं आतां तुला काम पाहून ठेवलं आहे मीं. आमच्या गांवचे रामजीशेट रावण आहेत ना, त्यांच्या जांवयांकडे. डॉक्टर आहेत ते. त्यांना दवाखान्यांत मोलकरीण हवी आहे. जाशील?"

"जाईन कीं! काम करायला आणि पोट भरायला तर आलों आपण इथें. मास्तर मला म्हणाले होते, काम करच तूं पोटासाठीं पण, काम करूनही कांहीं तरी शीक."


"शीक कीं! माणसानें शिकलं हें पाहिजेच. अडाणी कां म्हणून राहायचं?"

"शिकेन मी." पारू म्हणाली.

गोटीच्या प्रवासाचा सबंध दिवस-रात्रीचा शिणवण. त्यांत आणखी खोली लावण्याची दगदग. त्यामुळें दोघांनाही झोप रात्रीं तेव्हांच लागली.

पहाटेला ट्रामगाड्यांचा खडखडाट रोजच्यासारखा सुरू झाला. झोपमोड झाली म्हणून त्रासून पारू डोळे चोळीत उठली. पण उठली. शिवरामला जेवण करून द्यायचें होतें.





# २. सात वर्षांनंतर

सात वर्षें त्या तिघांचा गरिबीचा संसार मुंबईंत चालला होता.

ह्या सात वर्षांत काळ कितीतरी पालटला होता. त्या कुटुंबाची राहाणी आणि परिस्थितिही बरीच बदलली होती. गरिबीचाच संसार त्यांचा; पण तो आतां जरा ठाकठीक चालला होता.

पारू कोंकणांतून येतांना जेमतेम अक्षर ओळखायला शिकली होती. ती त्याच डॉ. जाधवांच्या इस्पितळांत मोलकरणीची नोकरी करून आतां फावल्या वेळांत चांगलें लिहायला वाचायला शिकली होती. ती मोलकरणीची इस्पितळांतील दाई आणि दाईची नुकतीच आतां तेथेंच नर्स झाली होती. डॉक्टर भले माणूस होते. त्यांनाही वाटे कीं आपल्या नोकरांनीं खूप खूप शिकावें.

पारूचीही कष्ट काढण्याची मनापासून तयारी. त्याला बऱ्या बुद्धिमत्तेची जोड आणि डॉक्टरांची अनेक परींनीं मदत. संधी चालून आली तरी माणसानें ती साधावी लागते. पारूनें ती साधली.

शिवरामनेंही तशीच चांगलीच संधी साधली. तोही कामधंदा करून सात वर्षांत चांगलें लिहायला वाचा-

यला शिकला. शिकून कामगाराचा बँकेंत शिपाई झाला. शिपायाचा तो आतां गोदामखात्यांत कारकून झाला होता. दोघांही नवराबायकोंना पगारही आतां बरा मिळे.

शंकर आतां नुकताच दुसऱ्या वर्गांत बी. एजी. झाला होता. तो वसईच्या इंग्रजी शाळेंत मास्तर म्हणून नोकरीला लागला होता.

त्या दिवशीं शिवराम नोकरीवरून कांहीं कामासाठीं जरा लौकर बिऱ्हाडीं येत होता. त्याचें बिऱ्हाड आतां बदललें होतें.

कोंकणांतील त्यांच्या राहत्या रावणगांवचे खोत रामजीबाबा रावण फार वर्षं मुंबईंत कंत्राटदाराचा धंदा करीत होते. धंद्यांत पैसा मिळवून ते खूप श्रीमंत झाले होते. चार वर्षांपूर्वी रामजीबाबांनीं परळ भागांत एक मोठी पांच मजली चाळ बांधली होती. आपल्या गांवाची आठवण म्हणून चाळीचें नांव ठेवलें होतें 'रावणगांव चाळ.'

रामजीबाबांचें गांवावर प्रेम, तसें मुंबईंत पोटासाठीं आलेल्या गरीब रावणगांवकऱ्यांचें रामजीबाबांवर प्रेम. ज्यांची शिवराम कदमासारखी जागेची गैरसोय होती असे आठदहा गांवकरी रामजीबाबांकडे आले.

म्हणाले, "रामजीबाबा! आम्ही तुमचे गांवकरी. तुम्ही आमचे धनी. आम्हांला राहायला चाळींत जागा द्या."

दिगंबरपंत खरे मास्तर म्हणजे खरा देवमाणूस. खरा गांवसेवक. आज बारा वर्षें मास्तर रावणगांवांतच शाळेंत नोकरीला होते. खरेंखुरें गांवराज्य शोभावें अशी गांवाची सर्व बाजूंनीं सुधारणा व्हायला कारण हे मास्तर आणि त्यांनीं सांगितलेलें आपल्या व गांवच्या बऱ्याभल्याचें ऐकणारे रावण-गांवकरी.

मास्तरांचेंही पत्र रामजीबाबांना चाळ तयार झाली तेव्हांच आलें



होतें कीं गरीब गांवकऱ्यांच्या अडीअडचणी अगोदर पाहा.

रामजीबाबानें आपल्या गांवकऱ्यांना नव्या चाळींत राहायला जागा दिली.

आज चार पांच वर्षें शिवराम कदमाचें बिऱ्हाड 'रावणगांव' चाळींत होतें.


शिवराम त्या दिवशीं बिऱ्हाडीं येत होता. तोंच मोठ्या रस्त्याच्या तिकटीवर एक प्रसंग गुदरला.

एक टॅक्सी एका बाजूच्या रस्त्यानें जरा जोरांत आली. दुसऱ्या बाजूकडून एक बारा वर्षांचा शाळकरी पोरगा येत होता. त्याच्या मागें एक पोक्त वयाचे साधे पांढरे खादी कपडे घातलेले कोंकणी दिसणारे गृहस्थ येत होते.

तो मुलगा कसला विचार करीत चालत होता कोण जाणे. पण तिकडून एक टॅक्सी आली तरी त्याचें तिकडे लक्षच नव्हतें.

टॅक्सीवाल्यानें रबरी पोंगा वाजवला. तरी ह्याचें तिकडे लक्ष गेलें नाहीं. हा आपला आपल्याच नादांत चालला होता.

तरी बरें. ते कोंकणी गृहस्थ तो पोरगा चालला आहे आणि



टॅक्सी आली हें सावधपणानें पाहात रस्ता ओलांडीत होते.

ते खेड्यांतले खरे, पण त्यांना चांगलें माहीत होतें कीं मुंबईचे रस्ते रहदारीच्या खूप गर्दीचे. नीट मागें पुढें पाहून चालायला हवें. नाहींतर गर्दींत अपघात व्हायचा.

तरी ते गृहस्थ आतां अपघात होणार असें पाहून ओरडले.

"अरे अरे मुला! थांब. पुढें जाऊं नकोस."

पण मुलगा कोठें भानावर होता! तो आपला चालला होता. त्या गृहस्थांनीं त्या मुलाला एकदम हाताला धरून थांबवलें, म्हणून मोठा अपघात टळला.

तरी पण लहानसा अपघात झालाच.

टॅक्सीचा धक्का लागून मुलगाही पडला आणि ते गृहस्थही पडले. शिवरामनें तें पाहिलें. तो त्या गृहस्थांकडे पाहून ओळखून मनांत म्हणाला, "अरे! हे आमचे खरे मास्तर!"

तो त्यांना आणि त्या मुलाला सावरायला धावला.

टॅक्सी भर वेगांत पुढें निघून गेली. इतका टॅक्सीवाला बेपर्वा!





# ३. इस्पितळांत

तो दिवस गेला. दुसरा दिवस उजाडला. डॉ. जाधवांच्या इस्पितळांत सकाळीं दिवसपाळीची पारू नर्स रोग्यांचे ताप पाहातां पाहातां मास्तरांच्या खाटेपाशीं आली.

मास्तर नुक्तेच जागे झाले होते. त्यांनीं पारूला पाहातांक्षणीं ओळखलें.

"आं? पारू! तूं इथें कुठें?" ते म्हणाले. फार दिवसांनीं रावणगांवांतील त्यांची एक प्रौढ विद्यार्थीण त्यांना भेटली. आनंद झाला.

"मी इथें नर्स आहें मास्तर! आज दिवसपाळी आहे माझी. रात्रीं झोप लागली चांगली तुम्हांला?"

"हो."

"ह्यांनीं मला सांगितलं काल. मी कामावरून नुक्तीच खोलीवर गेल्यें होतें. मग संध्याकाळीं येऊन तुम्हांला पाहून गेलें मी. पण झोप लागली होती तुम्हांला. म्हणून मग उठवलं नाहीं."

"हां! कसं काय ठीक चाललं आहे तुमचं?"

"ठीक चाललं आहे."

"मधून मधून पत्रं येतात कुणाचीं न कुणाचीं. गांवकरी येतात जातात. इकडची हकीकत विचारतों. एकूण तूं इथें नर्स आहेस."

" होय. हें डॉ. जाधवांचं इस्पितळ. आमच्या रामजीबाबांचे जावई हे डॉक्टर. "

" भला गृहस्थ आहे. नांव ऐकतों त्याचं मी. हां. आणि शिवराम कुठें आहे नोकरीला आतां ? "

" ते आतां ब्यॅंकेंत कारकून आहेत ना ! "

" आणि आमचा शंकर ? "

" शंकरराव आमचे बी. एजी. झाले ना मास्तर! सध्या वसईला मास्तर आहेत. दुसऱ्या चांगल्या सरकारी नोकरीसाठीं खटपट चालू आहे. "

" आनंद वाटला ऐकून. गांव सोडून मुंबईंत आल्यासारखं चीज झालं. पण गांवाला विसरूं नका बरं ! "

" आमच्या गांवाला आम्ही कशीं विसरूं मास्तर? नाहीं विसरणार. आपलं गांव आतां पुष्कळ सुधारलं आहे असं ऐकतों. "

" होय. गांव सुधारलंही आहे आणि त्याहून अधिक सुधारणा गांवाची व्हावी ह्यासाठीं आमची खटपटही सुरू आहे.

" मागें गांवकऱ्यांच्या मदतीनें नवी शाळा बांधली. ती आतां अगदीं पुरेनाशी झाली आहे. मुलं वाढलीं ना शिकणारीं ! देवळांत देखील मुलं बसतात. तरीही जागा अपुरी पडते. आतां नवी मोठी शाळा गांवाला हवी आहे. "

" आणि प्रसूतिगृह बांधलं का ?"

" नाहीं. आतां बांधायचं. आमची घरची नर्स शिकून तयार झाली. आतां मदत मिळवून, गांवकऱ्यांनीं कष्ट करून बांधायचं. पण तेंही नक्की बांधायचं. ह्या नाहींतर पुढच्या सालीं तरी. "

" गांवांतली विविध कार्यकारी सोसायटी चांगली चालली आहे असं ऐकतों आम्ही. "

" गां व च्या स ग ळ्या सं स्था चांगल्या चालल्या आहेत. पण गांवाला आज आणखी मोठी गरज —खरं म्हणजे आपल्या गांवीं मोठी शेतकीशाळा ह्या शाळेंतूनच चालवतां येईल. "

" पण मुख्य म्हणजे गांवाला पाण्याची सोय नाहीं ना! पाणी असतं भरपूर, तर आमच्या गांवची

जमीन अशी कसदार आहे कीं शेत पेरावं आणि सोनं पिकवावं त्यांत."

"होय. होय. त्याचीच कांहीं सोय होते का पाहायला आलों आहें मी मुंबईत. जमलं तर मग साऱ्यांना सांगायचं. नाहींतर आमचे आपले मनांतले मांडे मनांत."

बोलतां बोलतां मास्तर मनापासून हसले.

तोंच पलीकडे मास्तरांच्या खाटेपासून तिसऱ्या खाटेपाशीं पांच-सहा मुलें येऊन बसतांना पारूनें पाहिलीं. मास्तरांनींही पाहिलीं. तीं मुलंही त्यांच्याकडे पाहात होतीं.

"तुम्हीं आपणाला काल वांचवलं असं बाबू आपल्या मित्रांना सांगतो आहे." पारू मास्तरांना म्हणाली.

"तो कालचा पोरगा? काल मरतां मरतां वांचला तो?"



"होय. किती हुषार आणि चांगला पोरगा आहे तो मास्तर! पण घरचा अगदीं गरीब हो! बाप आहे, पण दारुडा. आई कामधंदा करते, आणि कशीबशी लेकाला शिकवते. अंगांत घालायला दुसरा सदराही नाहीं त्याला. एक सदरा. आठवड्यानें दर रविवारीं धुवून वाळवून पुन्हा आठवडाभर अंगीं घालायचा. तो मळेल नाहींतर काय होईल? मग मास्तर रागावतात. ते त्याला स्वच्छ कपडे करून यायला घरीं पाठवतात कालच्यासारखे. वर्गांत बसूं देत नाहींत. मग काय करील बिचारा? मला सांगा."

बोलतां बोलतां पारूच्या डोळ्यांना पाणी आलें.

मास्तरांना तें ऐकून कळवळा आला. ते उठले. त्या मुलाच्या खाटेपाशीं गेले. मुलें आपसांत बोलत होतीं. ते मुद्दाम ऐकत दूर उभे राहिले. त्यांना तीं मुलें फार आवडलीं.

तीं मुलं बोलत होतीं—बाबू त्यांचा मित्र घरचा फार गरीब. त्याला नवा सदरा आपण कष्ट

करून पैसे मिळवून घेऊन देऊं, असा त्यांचा बेत चालला होता.

कोण म्हणे, "मी वर्तमानपत्रं चार दिवस विकून पैसे मिळवीन."

दुसरा म्हणे, "मी पुस्तकांची बांधणी करून देऊन पैसे मिळवीन. स्वस्त आणि सुबक काम केलं कीं पैसे मिळतात. आमचा घरचाच धंदा आहे तो."

असें ते आपसांत बोलत होते. बोलतां बोलतां ते रंगांत आले. सारा गोंगाट होऊं लागला.

तों त्यांतला एकजण बाकीच्यांना म्हणाला, "अरे, जरा हळू बोला कीं! इस्पितळ आहे हें. मोठ्यानें बोललें कीं रोग्यांना त्रास होतो."


लगेच गोंगाट बंद झाला. मास्तर पुढें होऊन बाबूची गोड मायाळू शब्दांत विचारपूस करूं लागले. ते मुलांना म्हणाले, "बाळांनो! स्वतः श्रम करून पैसे मिळवायचे आणि गरीब गरजू विद्यार्थ्यांना मदत करायची आतांची तुमची कल्पना फार चांगली आहे. तुमच्या शाळेंत तुम्ही असं गरीब विद्यार्थीसाहाय्यक मंडळ जरूर काढा."

"आम्ही काढूं. पण तुम्ही आम्हांला काय काय कसं कसं करावं तें नीट समजावून सांगा." मुलें म्हणालीं.

"चला बाहेर व्हरांड्यांत बसूं बोलत. सांगतों तुम्हांला सारं." असें म्हणून मास्तर मुलांना घेऊन बाहेर गेले.

पारू काम करतां करतां तिकडे कौतुकानें पाहात होती.





## ४. मास्तरांचें काम झालें

त्याच दिवशीं डॉक्टरांबरोबर स्वतः रामजीबाबा रावण मास्तरांना आपल्या बंगल्यावर न्यायला इस्पितळांत गाडी घेऊन आले.

मास्तरांची प्रकृतिही आतां चांगली होती. पण शेटजी मुद्दाम आपणासाठीं आले ह्याचा मास्तरांना मनांतून संकोच वाटूं लागला.

"मीच येणार होतों कीं आपणाकडे. आपण उगीच तसदी घेतली." मास्तर रामजीबाबांना म्हणाले आणि त्यांचा आग्रह पाहून डॉक्टरांच्या परवानगीनें रामजीबाबांबरोबर गाडींतून बंगल्यावर गेले.

"आंधळा मागतो एक डोळा तर देव म्हणतो दोन घे. तशी मला आपल्या भेटीची गरज होती. मी येणार होतों. ते माझी गरज भागवायला आपण आलां." मास्तर मोटरींत म्हणाले.

बंगल्यावर गेल्यावर चहापाणी झालें. नंतर मास्तरांनीं आपला मुख्य विषय काढला.

"आपलं रावणगांव वाढतं आहे. दिवसेंदिवस भरभराटतं आहे. पण गांवाच्या वाढत्या गरजा. त्यांना नुसते गरीब गांवकरी कसे पुरे पडणार? गांव साऱ्यांचा आहे. प्रत्येकजण गांवाचं लेकरूं. आपण

आमच्या गांवचे धनी. आपले आशीर्वाद हवे गांवाला. आपली मदत हवी." मास्तर म्हणाले.

"तुम्ही जें जें कांहीं करतां तें तें सारं गांवासाठीं करतां मास्तर! तुम्ही गांवीं आहां, म्हणून आमचं रावणगांव आज एवढ्या रंगारूपास आलं आहे. तुम्ही काय सांगाल तें मी करीन. सांगा, काय मदत हवी तुम्हांला माझ्यापासून?"

"मदत हवी साऱ्या गांवापासून. गायीचं दूध काढायचं आणि तें गायीच्या सडांना लावून धार काढायची."

"आपल्या गांवाला पहिली गोष्ट नवी मोठी शाळा हवी. तसंच प्रसूतिगृह हवं. होय ना?"

"होय."

"तें माझ्याकडे लागलं. सांगा. किती पैसा लागेल ह्या दोन इमारतींना?"

"सगळा पैसा नको आम्हांला. गांवकरी एकजुटीनें काम करायला आनंदानें तयार आहेत. कामाला सुरुवात करूं आम्ही. सारे हातभार लावतील. ज्यांना साधेल ते पैसा देतील, पैसा ज्यांच्यापाशीं द्यायला नाहीं ते श्रम देतील. आतां, महागाई आहे. मंदी तर चोहींकडून आ करून खायला आली आहे. मनानें आमच्या उड्या मारे खूप मोठ्या असतात. पण अनेकदा अडतं. अशा वेळीं आपणासारखे खंबीर पाठीराखे गांवाला हवेत, उणं पडेल तिथें हातभार लावायला."

"असं करूं आपण मास्तर! शाळा आणि प्रसूतिगृह मी बांधून देईन. बाकी आणखी आहेतच कीं कितीतरी कामं गांवासाठीं करायचीं. तीं आपण तुम्ही म्हणतां तशीं श्रमदान घेऊन तरी करूं, किंवा वर्गणी जमवून, देणग्या मिळवून करूं."

मास्तरांना जें महत्त्वाचें बोलायचें होतें, जें बोलायला आणि करायला ते आज मुंबईला आले होते, तो विषय काढायला ही वेळ मास्तरांना फार अनुकूल वाटली. ते म्हणाले, "रामजीबाबा! मी आमच्या गांवच्या शाळेसाठीं म्हणा, किंवा गांवासाठीं म्हणा, एक मागणं मागायला आलों आहें."

"काय, बोला."



"आमच्या शाळेला जोडून शेतकी शाळा काढायची आहे. पण जमीन नाहीं आणि पाणी नाहीं."

"तीच तर मोठी अडचण आहे. जमीन आहे. एवढी मोठी ओसाडवाडी ओस पडली आहे. तसाच पलीकडच्या फकिराचा डोंगर. पण उपयोग काय?"

"पाणी मिळालं तर उपयोग होईल आणि प्रयत्न केले तर पाणी नक्की मिळेल."

"कुठें?"

"ओसाडवाडींत देवाचं तळं आहे. डोंगरांत फकिराची विहीर आहे. एका काळीं रहाट लावूनही उपसा होईना इतकं महामूर पाणी होतं म्हणतात त्या तळ्याला आणि विहिरीला. उपसा केला तर तें पाणी अजूनही कुठें गेलं नाहीं."

"पण उपसा करणार कोण आणि कसा? तुम्हांला माहीत आहे ना? भुताटकीच्या भयंकर जाचामुळें ओसाडवाडी आज जवळजवळ तीन पिढ्या ओस पडली आहे."

"तीच वाडी आपण लागवडीला आणूं. पूर्वीं त्या वाडीचं सुंदरवाडी नांव होतं म्हणे. तशी ओसाडवाडीची पुन्हा सुंदरवाडी बनवतां येईल आपणाला. आतां, भुताटकीचा तेवढा मोठा प्रश्न आहे."

"मोठा म्हणजे केवढा मोठा? एक माणूस त्या वाडींत कुदळ उचलायला किंवा नांगर धरायला तयार होणार नाहीं. गांवचे तर

नाहींतच. पण परगांवचे मजूर देखील पाऊल टाकायला तयार नाहींत त्या वाडींत!"

"होय. ती मोठी अडचण आहे खरी. पण आपण असं करा."

"अहो मास्तर! शाळेला वाडी मी फुकट देखील देईन. पण शाळेंत तरी आमचीं गांवाचींच मुलं ना? भुताटकी सगळ्या गांवाचा फडशा करील मुलं वाडींत उतरलीं कीं."

"म्हणूनच सांगतों मी तोड त्याला. मला खटपट करून पाहूं दे. माझ्या एकट्याच्या नांवानें वाडी खंडानें द्या. खंड माफक घ्या. पण द्या. मग मी मांत्रिक बोलवून, पंचाक्षरी बोलवून भुताटकीचा बंदोबस्त करतां येतोसा पाहीन. साधलं तर अनायासें काम होईल. माझ्या नांवावरची वाडी मग मी शाळेच्या स्वाधीन करीन. बरं, नाहीं साधलं, तर भुतं काय बाधणार तीं मला एकट्यालाच बाधतील."

अखेर रामजीबाबा कबूल झाले.

"मग, मी लागूं उद्योगाला?"

"बेलाशक लागा. ओसाडवाडी ह्यापुढें तुमची."

एवढें दोघे बोलतात, तोंच रावणगांव चाळींतली गांवकरीमंडळी मास्तरांना चाळींत न्यायला आली.

कितीही श्रम पडले तरी कोणालाही नाहीं म्हणणें मास्तरांना कधीं माहीतच नाहीं.

"अरे, मीच येणार होतों कीं मास्तरांना घेऊन चाळ दाखवायला. बरं. केव्हां यायचं?" रामजीबाबांनीं लोकांना विचारलें.

"उद्यां वेळ होईल?"

"हो. होईल." मास्तर म्हणाले.

"आमची चाळ म्हणजे आमच्या रावणगांवचं गोड फळं देणारं कलम आहे तें. मशागत मात्र आमच्या ह्या गांवकऱ्यांची बरं मास्तर!" हसत हसत रामजीबाबा म्हणाले.

तें ऐकून सारे मनापासून हसले.





# ५. चाळींतलें गांवराज्य

पाहुणे म्हणायचे एवढेंच. बाकी रामजीबाबा आणि मास्तर हे दोघेही रावणगांव चाळींत घरच्यासारखे.

तरीही शिवराम, पारू, शिवाजी बुरूड, तात्या माळी, वगैरे रावणगांवकरी मंडळी त्या दोघांचें स्वागत करायला उत्साहानें उभी होतीच.

"चला. अगोदर आमची चाळ पाहूं. बाकीच्या गोष्टी मग." मास्तर म्हणाले, "मला आमच्या शिवाजीबाबांचें बुरूडमंदिर पाहायचं आहे."


पारू आणि शिवराम मास्तरांना घेऊन शिवा बुरुडाच्या खोलीकडे गेलीं. जातांना एकमेकांकडे पाहून हसलीं.

त्यांनीं ओळखलें कीं रावणगांवांत अतिशय गलिच्छ जागेंत खितपत पडलेले हे बुरूड. शहरांत अशा चांगल्या संगतींत राहून ते सुधारतात कां तें मास्तरांना पाहायचें आहे.

जाऊन पाहातात तों बुरुडाची खोली कोण म्हणेल त्याला? कशी अगदीं आरशासारखी स्वच्छ. सामान कसें जेथलें तेथें.

"नळबाजारांत मोठं बुरडी दुकान आहे शिवाजीबाबाचं. चार-पांच नोकर आहेत दुकानांत. शिवाय घरचीं माणसं." शिवराम म्हणाला.

"तुम्हीं दाखवलेल्या 'वाटेनें जातों आहें मी मास्तर. सुखी आहें



तुमच्या आशीर्वादानें." शिवाजी बुरूड हात जोडून म्हणाला.

"अरे, मनापासून कष्ट करणारीं कष्टाळू माणसं सुखी असायचींच. ठीक आहे."

असें म्हणून शिवाजीला शाबासकी देऊन मास्तर बाहेर पडले.

मग पारू त्यांना घेऊन बालक-मंदिराच्या खोलीकडे गेली. खोलींत दोन म्हाताऱ्या बाया मुलांना खेळवीत बसल्या होत्या.

"ह्या आमच्या चाळीच्या आया. आम्ही कामावर गेलों कीं आमचीं मुलं ह्या सांभाळतात. कपडे, आंघोळ, खाणंपिणं, सारं. त्यामुळें आम्हांला बाहेर नीट काम करायला फावतं. चाळ कांहीं ह्या आयांना फुकट नाहीं पोशीत. ह्या हें काम करतात आणि चाळीकडून पोटाला मिळवतात." पारू म्हणाली.

"तसं हें आमचं कलामंदिर." असें म्हणून पारू मग मंडळीला पलीकडच्या खोलींत घेऊन गेली. चाळींतील बायका-मुलींनीं विणलेले रुमाल, परड्या, मातीचीं किंवा कागदाच्या रांध्याचीं खेळणीं अशा तयार केलेल्या चांगल्या वस्तु तेथें





होत्या. पारू त्यांतला एक सुतानें विणलेला नक्षीदार रुमाल दाखवीत म्हणाली, " आमचीं कलाकुसरीचीं कामं माफकमोली, बहुगुणी असतात. हा रुमाल पाहा, दुकानांतून सामान आणतों ना आपण. त्यांचे दोरे न टाकतां सांठवून सांठवून रुमाल केला आहे हा."

तशींच कागदाचीं सुंदर फुलें वगैरे कितीतरी वस्तु तेथें होत्या. गुलाबाचीं फुलें तर इतकीं हुबेहुब होतीं कीं रामजीबाबांनीं एक फूल उचलून वास घेऊन पाहिला.



असेंच मंडळीनें चाळीचें वाचनालय पाहिलें. सार्वजनिक दुकान पाहिलें. सहकारी सोसायटी पाहिली.

" अरे तुम्ही ह्या चाळींत आमचं रावणगांवचं गांवराज्यच उभं केलेलं दिसतं कीं! आणि तेंही आमच्यापेक्षां चांगलं." मास्तर खुष होऊन म्हणाले.

रामजीबाबांनीं हसत विचारलें, " इतक्या साऱ्या गोष्टी तुम्ही एकेका खोलींत करतां. मग ह्या खोल्यांतली मंडळी तुम्ही राहातां तरी कुठें ? "


पारू नम्रपणें खालीं मान घालून हसतमुखानें म्हणाली, " जेवणखाण आमचं आंतल्या खोलींत. दिवसा बहुतेक माणसं कामावर, नाहींतर नोकरीवर असतात. रात्रीं सारा पसारा आवरून झोपतां येतं. उजाडल्यावर पुन्हा झाल्या आपल्या चळवळी सुरू सोयीसोयीनें. कमी लोक ज्यांच्या घरांत असतील, त्यांचाच आम्ही असा सार्वजनिक कामासाठीं फायदा घेतों."


" आतां आम्हांला लहानसा दवाखाना हवा आहे चाळीसाठीं.

त्यासाठीं आम्हीं ठरवलं आहे कीं कुणी ना कुणी रजेवर असतोच. एखादी तरी खोली रिकामी सापडतेच. अशा खोलींत दवाखाना थाटूं आम्ही. आतां फुक्ट डॉक्टर हवा आहे चांगलासा. तो मिळाला कीं काम झालं." शिवराम म्हणाला.

"अरे, दवाखान्याला चाळींत आमची दिवाणजीच्या कचेरीची खोली घ्या तुम्ही. आमचे डॉक्टर येतील. त्यांना काय द्यायचं तें मी पाहीन. औषध वगैरे मी काय लागेल तें पुरवीन. नर्स आपली घरची आहेच पारू." रामजीबाबा हसत हसत म्हणाले.

"अंहं!" मास्तर म्हणाले, "नर्स घरची खरी. पण ती जाणार आहे कोंकणांतल्या घरीं लौकरच. तोंवर डॉक्टरांना सांगून तुम्ही दुसरी घरची नर्स तयार करा आणि गांवीं आणखी कोण कोण येणार तेंही ठरवा. खूप मोठा भरभराटणार आहे आमचा गांव आतां. आमच्या शाळेची आतां मोठी थोरली शाळा होणार आहे. प्रसूतिगृह होणार आहे. पाणी पुढच्या सालीं येऊन पाहाल तर महापूर. पाणीच पाणी. शेतीबरोबर घरगुती उद्योगधंदे किती किती चालवणार आहों आम्ही. ओसाड वाडीची सुंदरवाडी होणार आहे आतां. पाहा कुणाकुणाला अशा आमच्या नमुनेदार गांवराज्यांत राहायला यायचं असेल तें. जे येतील त्यांनीं गांवाबरोबर एकोप्यानें होईल तें काम धरावं. कष्ट करावे. पिकवावं. मिळवावं. सुखानें खावं प्यावं. आनंदांत राहावं. आम्ही आतां उद्यां रावणगांवाला चाललों. नमस्कार मंडळी, सर्वांना." असें म्हणून मास्तरांनीं चाळीचा निरोप घेतला.





# ६. ह्याला म्हणतात गांवकी !

रावणगांवचे सारे लोक मास्तर मुंबईहून कधीं येतात ह्याची वाटच पाहात होते. मास्तर आले. त्याबरोबर सगळे लोक भेटायला गेले.

" काय काय कामं झालीं आमच्या गांवाचीं मुंबईंत मास्तर ?" प्रत्येकजण आस्थेनें विचारूं लागला. कारण सर्वांना खात्रीच कीं मास्तर जें काम हातीं घेतील तें हटकून होणार.

" आपल्या गांवाला मोठी शाळा आपले खोत रामजीबाबा बांधून देणार आहेत. प्रसूतिगृहही बांधून देणार आहेत. " मास्तर म्हणाले.

" फार चांगलं. आपणाला करायला आणखी कितीतरी कामं आहेत नाहीं मास्तर ? पाऊसकाळांत ओहोळ हौरवणी भरून वाहूं लागले कीं ऐलवाडी आणि पैलवाडी दुभंगल्या. मग पैलवाडीच्या मुलांची शाळा बुडते. " भाऊ पाटील म्हणाला.

" होय. आणि गुरंवासरं देखील वाहून जायचा धोका. त्यासाठीं आपल्या गांवांत निदान दोन तरी चांगले सांडवे बांधायला हवे आपणाला. त्याखेरीज चालायचं नाहीं. " दुसरा एकजण म्हणाला.

" आणि मांगरघाटी नको बांधून काढायला ? कमरेइतका खोल एकेक खड्डा आहे वाटेंत. पावसांत तळीं

सांचतात. पाय चुकून माणूस पडला कीं फजिती. गुरंवासरं दरसाल पाऊसकाळांत आंत पडतात. ती सोय करायला हवी आपणाला मिरगाच्या अगोदर." तिसरा म्हणाला.

अशा गांवाच्या जरुरींच्या अडचणी जो तो आपलेपणानें गांवापुढें मांडूं लागला.

तोंच पाटील म्हणाला, "सगळं होईल. पण पाणी गांवाला कसं मिळेल तें सांगा अगोदर. पाणी नाहीं, म्हणून गिमवस शेतीचं तर नांव नको. माड, पोफळी, केळी लावायलाच नको. पण पाऊसकाळांत देखील जर ताप पडली, तर सोन्यासारख्या शेतीची करपून मरून माती होते. ह्याला काय उपाय?"

मास्तरांना तोच विषय चर्चेंत निघायला हवा होता.

"ह्याला उपाय आहे." मास्तर म्हणाले, "खोतांनीं सारी पड ओसाडवाडी दिली आहे."

त्यासरशा त्या सर्व गांवकऱ्यांच्या चर्या एकदम गोऱ्यामोऱ्या झाल्या. मास्तरांनीं ओळखलें कीं हें आज तरी कोणाला कांहीं पटणार नाहीं.

"ओसाडवाडी कसवायला लागेल त्याच्या दारादाराला काडी. भुतं खवळलीं तर आमच्या साऱ्या गांवाची वाताहात उडेल."

"अरे आपण प्रयत्न करून बघूं तर खरं! पंचाक्षऱ्याला आणूं."

दादा गांवकर भगताकडे पाहून मास्तर म्हणाले, "असल्या गोष्टींतला जाणता मांत्रिक, पंचाक्षरी, भगत, सारा कांहीं गांवाचा गांवकर तो."

दादा गांवकर एकदम उठून म्हणाला, "नाहीं रे बाबा! आपण तीं भुतं गाडायच्या भानगडींत नाहीं पडणार. माझं वाटोळं होईल कीं!"

मास्तरांना ती कल्पना होतीच.

हा गडी आपलें कांहीं चालूं देणार नाहीं, साऱ्या देवभोळ्या, भूतभोळ्या गांवकऱ्यांना बिथरवणार, पुन्हा अनुकूल वेळ येईतों आपण स्वस्थच बसणें योग्य असें पाहून मास्तरांनीं तो विषय तूर्त तेवढ्यावरच सोडला आणि त्याला अगदीं नवी कलाटणी दिली. "बरं चला ठरवून टाकूं या आतां, ओहोळावर सांडवा आधीं बांधायचा कीं बांबरघाटी आधीं हातीं घ्यायची?"



# ७. कांहीं दिवसांनंतर

पावसाळा तसाच गेला. रावण-गांवांत गांवाच्या सोयीसाठीं सांडवे बांधायला हवे होते, ते गांवकऱ्यांनीं सर्वांनीं एकजुटीनें बांधले.

बांवरवाडीची वाटही चांगली दुरुस्त झाली.

पण ओसाडवाडीचा आणि गांवाच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मात्र तसाच अधांतरीं लोंबकळत होता.

तशांत त्या वर्षीं त्या सेप्टेंबर महिन्यांत शेतें पोसून पिकण्याच्या ऐन वेळीं पावसानें त्या टापूंत लागोपाठ तीन आठवडे कोठें दडी मारली होती नकळे.

रावणगांवचे सारे शेतकरी चिमणीएवढें तोंड करून आकाशाकडे डोळे लावून बसले होते.

तोंच एके दिवशीं मास्तरांना एक स्वप्न पडलें.

उजाडल्यावर त्यांनीं गांवचा पाटील, बाबा गांवकर आणि इतर गांवकरी ह्यांना बोलावलें.

सारी मंडळी जमली. मास्तर त्यांना म्हणाले, "बरं का रे बाबांनो! मला काल एक स्वप्न पडलं. तुम्हीं ऐकून घ्यावं आणि मला कांहीं उपाय सुचवावा त्यावर म्हणून सांगतों. ऐकाल? सांगूं?

"सांगा. सांगा." सारेजण उत्सुकतेनें म्हणाले.

"ऐका तर, सांगतों." मास्तर स्वप्न सांगूं लागले, "एक मोठा कल्लेदार मिशीवाला माणूस आणि एक फकीर दोघे काल माझ्या स्वप्नांत आले. मला म्हणाले, 'रावणगांवाचं बरं करावं आम्हीं असं तुला वाटतं का?' मी म्हणालों, 'होय.' त्यावर दोघेही म्हणाले, 'तर एक देवाच्या तळ्यावर आणि एक फकिराच्या बावीवर असे दोन ठिकाणीं दोन नारळ ठेवून गांवाला घेऊन तूं गाऱ्हाणं घाल. म्हणावं, आम्हांला देवाचं तळं उपसायचं आहे. फकिराची विहीर उपसायची आहे. गांवाला पाणी हवं आहे. पाणी मिळालं कीं आम्ही ओसाडवाडींत पहिलं पीक काढूं, त्याचं गांवजेवण घालूं. असं गाऱ्हाणं करून तळं आणि बाव उपसा. तुम्हांला कांहीं त्रास व्हायचा नाहीं. शेत पिकलं, त्याचं गांवजेवण घातलंत, कीं आम्ही आमचा गांवावरचा आकस सोडला. मग खुशाल ओसाडवाडीची सुंदरवाडी पिकवा. खा. सुखांत राहा. मात्र ह्यांत कांहीं चुकाल तर ठार व्हाल.' असं स्वप्न पडलं मला. मग काय, करायचं?"

पाटील म्हणाला, "जरूर करायचं. भुतांची पिडा टळल्यावर आणखी काय पाहिजे आपणाला?"

बाकीचे सारेजण तसेंच म्हणाले. कारण गांवांत उन्हाळा आला कीं पाणी मिळण्याची मारामार पडे.

"मग तरी डोंगरावर भुतांच्या दोन चुडी दिसतात त्या दिसायच्या बंद होतील का?" दादा गांवकरानें विचारलें.

सगळ्यांना तो प्रश्न पटला. तीच मास्तरांना पडली पंचाईत. आतां काय सांगावें?

पण मास्तर मोठे प्रसंगावधानी होते. ते म्हणाले, "असं करूं आपण. गांवजेवण घालूं तेव्हां तसं गाऱ्हाणं करूं त्या दोघां भुतांना कीं चुडींचा प्रश्नच मिटला. बघूं काय होतं तें."

तें मात्र सगळ्यांनाच पटलें.

"मग करायचं असं उद्यांपासून?" मास्तरांनीं विचारलें.

"करायचं. जरूर करायचं." सारेजण म्हणाले.



# ८. भुतांच्या चुडी

देवाचें तळें आणि फकिराची विहीर खोदायला दुसऱ्या दिवशींच मास्तरांच्या हातून सुरुवात व्हावी असें लोकांनीं ठरवलें. पण मास्तरांचेंच मत निराळें पडलें. ते म्हणाले, "अरे, मुहूर्ताची पहिली कुदळ मारायचा मान गांवकऱ्यांचा. आमचे दादा गांवकर आणि आमचे पाटील, दोघांचे हात पहिल्या कुदळीला लागायला हवेत."

सर्वांना तें पटलें. दादा गांवकरानें तळें उपसायला मुहूर्त काढून दिला.

पाटलांनीं फकिराची विहीर उपसायला पहिली कुदळ मारून सुरुवात केली.

सारा रावणगांव—फकिराच्या विहिरीपाशीं राहणारे मुसलमान देखील कामाला लागले. मग काम पुरें व्हायला काय उशीर?

पंधरा दिवसांत उपसा पुरा झाला. तसें तळें आणि विहीर पाण्यानें तुडुंब भरलीं.

लोकांनीं रहाट आणि लाटी लावून पाणी उपसून पाहिलें. पण किती उपसलें तरी पाणी वीतभर देखील कमी होईना.

सगळ्या गांवाला आनंद झाला आणि एके दिवशीं रात्रीं अचानक डोंगरावर भुतांच्या चुडी पेटलेल्या दिसूं लागल्या.

लोक जरा घाबरले. त्यांना भय वाटूं लागलें कीं भुतें पुन्हा गांवाला छळायला उठलीं कीं काय ?

सारेजण दादा गांवकऱ्याकडे गेले. कारण गांवकर भगत. भगत त्या लोकांना घेऊन मास्तरांकडे आले.

मास्तर तें ओळखूनच होते. ते सगळ्यांना सांगूं लागले, "अरे बाबांनो ! डोंगरावर उजेड दिसतो त्या भुतांच्या चुडी नव्हेत कांहीं."

"मग काय आहे तें ?" दादा गांवकरानें जरा चिडून विचारलें. त्याला तें पटेना.

"सांगतों तें काय आहे तें. अरे, कांहीं झाडंझुडपं अशीं चमत्कारिक असतात. रात्रीं त्यांच्या मुळांतून, खोडांतून प्रकाशाचे झोत निघतात. काजवे पुष्कळसे एकदम झाडावर बसले कीं त्यांचाही असाच चूड पेटल्यासारखा प्रकाश दिसतो. आपणाला हें माहीत नसतं म्हणून आपण त्यांना भुतांच्या चुडी म्हणतों." मास्तर म्हणाले.

पण तें कांहीं कोणाला पटेना आणि मास्तरांना तर तें पटवून द्यायचें होतें. लोकांच्या मनांतली भुतांची भीति घालवायची होती.

"समक्ष जाऊन खात्री करून घेऊं चला. कोण कोण येतो ?" मास्तर म्हणाले.

"मी येतों चला." पाटील म्हणाला. मग दादा गांवकरही त्यांच्याबरोबर जायला तयार झाला.



कंदील पेटवून निघाले तिघे डोंगरावर भुतांच्या चुडी पाहायला.

आणि जाऊन पाहतात तों खरेंच. तें एक प्रकाश देणारें झाड होतें. प्रत्यक्ष पाहिल्यावर पाटील आणि गांवकर ह्या दोघांचीही खात्री पटली. भीति उडाली.

" का हो मास्तर ? " ते तिघेही माघारे गांवाकडे निघाले, तेव्हां वाट चालतां चालतां पाटील मास्तरांना विचारूं लागले, " आणि दिवेलावणीच्या सुमाराला भाकरी भाजल्यासारखा वास कधीं कधीं येतो. तीं भुतं भाकरी भाजतात म्हणतात. खरं का हो तें ? "

" त्याचीही अशीच गंमत आहे पाटील. " मास्तर म्हणाले, " एक प्रकारची लहान वनस्पति असते. ती दिवेलावणीच्या सुमाराला फुलते. तिचा वास भाकरी भाजल्यासारखा येतो. आपणाला तें माहीत नसतें. त्या वनस्पति माहीत नसतात, म्हणून आपण म्हणतों कीं भूत भाकरी भाजतं आहे. "

अशा मजेदार गोष्टी सांगत मास्तर गांवांत आले. तरी गोष्टी ऐकून पाटील आणि गांवकर ह्यांचें समाधान झालें नाहीं.

मग मास्तर त्या रात्रीं मध्य-रात्रींपावेतों अशा गमतीच्या गोष्टी सांगत बसले होते.

त्यांना झोपण्यासाठीं निरोप देतांना शास्त्रीबुवा म्हणाले, " अशा आणखी कितीतरी मजेच्या गोष्टी आहेत. त्यांतलं मर्म आपण ओळखून वागायला हवं. चुकीच्या समजुतींचं वळण आयुष्याला लागूं नये. कोणतीही गोष्ट करतांना किंवा करायची टाळतांना कां आणि कसं हें पारखून घ्यायला हवं. "

देवाचें तळें आणि फकिराची विहीर, पाण्यानें तुडुंब भरलीं. एकेक जिवंत झरा पायाच्या आंगठ्यासारखा. मग पाण्याला काय तोटा !

तरीदेखील लोक गांवजेवणापूर्वीं त्या तळ्या-विहिरीचें पाणी पिईनात. त्या पाण्यावर अगोदर वागाही करायला तयार होईनात.

मास्तर मनांत म्हणाले, " इतकीं वर्षं वाडी ओस पडलीच आहे ना ? तसे आणखी चार पांच महिने जातील. जाऊं देत. "

गांवजेवण घालायचें, म्हणजे पहिलें पीक शेतांत भाताचेंच काढायला हवें. गिमवस-उन्हाळी भात पेरायचें, शेत पिकायचें, तांदुळ तयार व्हायचे, म्हणजे जवळ जवळ चैत्र पाडवा उजाडणार.

"तोंवर शेत पेरायचें तेवढें थांबूं. पण जमीन नांगरण्यापासून बाकीचीं कामं तर आटोपून घेऊं!" मास्तर गांवकऱ्यांना म्हणाले.

गांवकऱ्यांना तें पटलें. उन्हाळी शेतीचीं कामें जोरांत सुरू झालीं.

कामें सुरू करतांना मास्तरांनीं सगळ्यांच्या संमतीनें कांहीं गोष्टी गांवासाठीं कायमच्या ठरवून टाकण्याचें योजिलें. ते म्हणाले, "अरे, असं बघा, एकेकानें अलग अलग डाळीडाळीएवढा जमिनीचा तुकडादेखील पिकवीत बसायचं, अशानें शेती कशी नीट होईल रे? प्रत्येकाचं जोत निराळं, खत निराळं, राखण निराळी, पेरणी–निंदणी–कोळपणी निराळी. असं कुळचा कुळचा पाणी उपसून शेती करणं आतां कसं रे परवडणार? त्यापेक्षां असं करूं आपण. सगळ्यांनीं सगळ्या जमिनींत राबायचं. खतपाणी, मशागत सारं एकांत करायचं."

"आणि मग पिकाची वांटणी कशी करायची?" एका शेतकऱ्यानें विचारलें. त्याला ती सहकारी शेतीची गोष्ट अगदींच अनोळखी होती.

मास्तर म्हणाले, "अरे, शेतांत राबणाराचा दरडोई हिशेब धरायचा. बैल किती, राबणारीं माणसं किती, असा हिशेब पाहायचा. खत-पाणी विकत घ्यायचं, त्याचा एकरास हिशेब करायचा. खर्च हिस्सेरशीनें वांटून घ्यायचा, तसं पीकही हिस्सेरशीनें वांटून घ्यायचं."

सर्वांना वाटलें कीं मास्तर सांगतात हें चांगलें आहे. तें कसें, तें तर त्यांच्या नीटसें ध्यानीं येईना. पण म्हणून तें पसंत नाहीं असेंही म्हणवेना.

"असं करूं आपण, एकदा नमुन्यासाठीं प्रयोग तर करून बघूं! अनुभवानें कळत जाईल तसतसा जरूर तो बदल करीत जाऊं आपण आपल्या योजनेंत." मास्तर म्हणाले.

"होय. हा आपला गांवराज्याचा कायदा. आपण करायचा, आपणच

सुधारायचा. हेंच चांगलं." पाटील म्हणाला.

"तशीच चांगली फायदेशीर शेती करायची, तर आपणाला जपानी पद्धतीनें शेती करतां येईल. शेतीसाठीं एव्हांपासून कंपोस्ट खत तयार करतां येईल. निरनिराळीं खतं घालून जमिनीचा कस वाढवतां येईल."

"होय मास्तर! आणि जें पीक जमिनीचा मगदूर पाहून जमिनींत काढायचं, त्याला साजेसा जमिनीचा कल खतपाणी घालून तयारही करतां येईल. आपल्या गांवाचं नशीब थोर. म्हणून एक फार चांगली गोष्ट झाली आहे." पाटील म्हणाला.

"कोणती हो?" दादा गांवकरानें विचारलें.

मास्तर म्हणाले, "अहो गांवकर! आपल्या गांवचा पोरगा आमच्या तालुक्याचा मामलेदार म्हणून नुक्ताच बदलून आला आहे ना!"

"कोण तो?" लोक विचारूं लागले.

"आपला तो शिवरामभाऊ कदम नाहीं? त्याचे चिरंजीव शंकरराव कदम मामलेदार आहेत आतां आपले. ते शेतकीशास्त्रांतले पदवीधर आहेत. बी. एजी. त्यांना आपण हक्कानें बोलवूं. त्यांच्याकडून हवी ती माहिती घेऊं."

"वा:! ही तर फारच आनंदाची गोष्ट आहे." मास्तर म्हणाले, "आतां आपण शाळा आणि प्रसूतिगृह ह्यांच्या मागें लागूं. पत्र लिहितों आज रामजीबाबांना, कीं तळं, विहीर उपसून झालीं. आतां उन्हाळी शेती करणार आम्ही त्या पाण्यावर. भाजीपाला, फळबाग, फूलबाग, सारं करणार सारा गांव मिळून. आतां शाळा आणि प्रसूतिगृह ह्यांची काय ती उणीव आहे. तेवढी मेहेरबानी तुम्हीं करावी.

"आणखी हेंही लिहून ठेवा कीं हा उद्घाटनाचा समारंभ तुमच्या हातून व्हावा." पाटील म्हणाले.

"लिहितों. आणि त्यांचे जांवई — आमचे डॉ. जाधव. त्यांना लिहितों कीं आमच्या गांवची पारू नर्स आमची आम्हांला पाहिजे आतां." मास्तर म्हणाले.

सर्वांच्या मतानें असा बेत ठरला.



# १. सुंदरवाडी

आज रावणगांवांतील गांव-जेवण. आजपासून पन्नास वर्षांपेक्षां अधिकच ओस पडलेली ओसाडवाडी पुन्हा लागवडीला येणार होती.

ओसाडवाडींतील जमीन फार वर्षांपासूनची पडीक. ओसाड. तशांत जमीन मूळचीच चांगली सुपीक.

शिवाय सारा गांव त्या शेतांतून मुहूर्ताचें पहिलें पीक काढण्यासाठीं हौसेनें वेळीं अवेळीं हवा तेव्हां हवा तितका राबत असतो. त्याला शंकरराव कदमांसारख्या शेतकी पंडित गांवकऱ्याच्या मार्गदर्शनाची जोड. मग त्या शेतांतलें तें पहिलेंच उन्हाळी पीक भरघोंस कां येणार नाहीं ?

शेत पिकलें. कापणी, मळणी झाली. रास काढली. गांवजेवणाला पुरून उरेल इतकें भात आणि इतर धान्य बाजूला काढून ठेवूनही कितीतरी धान्य शिल्लक उरलें.

आतां ह्या उरलेल्या धान्याचें काय करायचें ?—प्रश्न पुढें आला.

शेवटीं मास्तरांनीं एक नामी युक्ति सुचविली. ती सर्वांना पटली.

गांवजेवण घालून उरलेलें धान्य गांवकोठार म्हणून बाजूला काढून ठेवायचें. दरसाल त्यांत सर्वांच्या मतानें ठरेल ती भर घालायची. दरसाल जुनें धान्य देऊन त्या बदली नवें ताजें धान्य गांवकोठारांत

भरायचें. गांवांत कुणाला गरज लागली तर ती त्या गांवकोठारांतून मागवायची.

ही योजना सांगून मास्तर पुढें म्हणाले, "अरे ही गांवाची धान्य बँकच म्हणाना! बँकेसारखेच सारे व्यवहार चालायचे."


इतकी चांगली सूचना कोणाला झाली तरी कां अमान्य होईल?

ह्या धान्य बँकेचें उद्‌घाटन, तसेंच शाळा, प्रसूतिगृह, दवाखाना, नवें खादीमंदिर, हे सारे उद्‌घाटन-समारंभ त्या एका सुंदर आणि मंगल दिवशीं सायंकाळीं गांवजेवणानंतर समारंभानें साजरे होणार होते.

समारंभाला पुष्कळ पाहुणे आले होते. रामजीबाबा रावण, डॉ. जाधव, शिवराम कदम, पारू कदम, मामलेदार शंकरराव कदम आणि मुंबईची इतर बहुतेक रावणगांवकरी मंडळी आली होती. मंडळीचा येण्याजाण्याचा सारा खर्च रावणशेटच करणार होते.

गांवकऱ्यांची त्या समारंभांतील डोळ्यांत भरण्याजोगी करामत म्हणजे मुख्य रस्त्यापासून गांवांतील चावडीपावेतोंचा गाडीरस्ता. गांवकऱ्यांनीं घरटिप माणूस कामाला देऊन तो रस्ता तयार केला होता. रस्ता इतका चांगला होता कीं समारंभासाठीं मोटरी त्या रस्त्यानें नीट आल्या.

"हा रस्ता गांवाला आतां हवाच होता." मास्तर म्हणत, "आतां ओसाडवाडीची सुंदरवाडी होते आहे. ह्या सुंदरवाडींत आतां धान्य म्हणूं





नका, भाजीपाला म्हणूं नका, फळफळावळ म्हणूं नका, —आणि आम्ही आतां गायीम्हशी पाळून चांगलं दुभतंघरही चालवूं. आमचा माल आम्हांला नको असेल तो बाजारांत पाठवायचा, तर स्वतःच्या गाड्या हव्या आणि रस्ता हवा."

गांवजेवणांत गांवकऱ्यांना वाढायला गांवच्या हव्या तेवढ्या बायका आल्या होत्या ह्यांत नवल नाहीं. पारूबरोबर खोतीणबाई अगदीं पदर खोंचून वाढीत होत्या हें नवल.

मास्तरांच्या बरोबरीनें रावणशेटही अंग मोडून गांवाला वाढीत होते.

सायंकाळीं ठरल्याप्रमाणें सर्व उद्‌घाटन समारंभ थाटानें आणि उत्साहानें साजरे झाले. अध्यक्ष रावणशेट होते.



अनेकांचीं भाषणें झालीं. मास्तरही बोलले. रावणशेट अगदीं मोजकें पण मोलाचें आणि महत्त्वाचें बोलले.

"मी विद्वान् नाहीं. वक्ता नाहीं. पण मी ह्या गांवच्या मातींत रुजलेला आहें. मीं मुंबईला जाऊन लाखों रुपये मिळवले. माझ्या गांवकरी बंधूंनींही मास्तरांच्या शिकवणीप्रमाणें वागून रावणगांवांत चांगल्या गांवराज्याचा पाया घातला आहे. ह्या गांवयशाच्या मानानें माझी लाखों रुपयांची दौलत कवडी किंमतीची आहे. महात्मा गांधींचा भक्त म्हणून घेण्याची माझी मुळींच लायकी नाहीं. पण गांधीजी मला देवासारखे पूज्य वाटतात. श्रीमंत लोक हे रावणाच्या गरिबांचे विश्वस्त आहेत. श्रीमंतांनीं आपली दौलत जरूर तेवढी थोडी स्वतःसाठीं ठेवावी, आणि बाकीची दौलत गरीब गरजूंसाठीं खर्च करावी, असं गांधीजींनीं सांगितलं आहे. त्याप्रमाणें मी माझ्या कुटुंबाच्या पोटापुरती दौलत माझ्याकडे ठेवणार आहें आणि बाकीची सारी दौलत गरिबांची गरिबांना नीट पावती होण्यासाठीं ह्या आमच्या सुंदरवाडीच्या गांवराज्याच्या हवालीं करणार आहें. आजपासून आपल्या गांवाचं नांव सुंदरवाडी. नमस्कार."



एवढा मोठा त्याग करतांना रावणशेटजींना इतका आनंद झाला होता कीं त्यांच्या गालांवर आनंदाश्रु ओघळतांना सर्वांनीं पाहिलें आणि शेटजींना मनांतून धन्यवाद दिले.

मास्तरांनीं पाटलांच्या हातानें अध्यक्षांना हारतुरे अर्पण केले. शेवटीं हा गोड समारंभ संपण्यापूर्वी शाळेंतल्या मुलां-मुलींनीं गोड स्वरांत राष्ट्रगीत गाइलें.

जनगणमन अधिनायक जय हे
भारत भाग्यविधाता ॥ ध्रु० ॥

" कामरूप, पंजाब, मराठा,
गुर्जर द्राविड वंग ।
उत्कल, विंध्य, हिमाचल, जमुना,
गंगा, जलधि तरंग ।

तव शुभ नामें जागे
तव शुभ आशिष मागे
गाहे तव यश गाथा

जनगण मंगलदायक जय हे
भारत भाग्यविधाता
जय हे, जय हे, जय हे ।
जय जय जय जय हे ॥ १ ॥

अहरह तव आव्हान प्रचारित
सुनि तव उदार वाणी
हिंदु बौद्ध सिख जैन पारसिक
मुसलमान ख्रिस्तानी

पूरब पश्चिम आसे
तव सिंहासन पासे
प्रेमहार हय गाथा
जनगणऐक्यविधायक जय हे

भारत भाग्यविधाता
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय जय हे ॥ २ ॥

रात्रि प्रभातिल उदित रवि-
च्छविपूर्ण-उदयगिरि भासे
गाहे विहंगम पुण्यसमीरण
नवजीवन रस ढाले

तव करुणारुण रागे
निद्रित भारत जागे
तव चरणे नत माथा

जय जय जय हे जय राजेश्वर
भारत भाग्यविधाता
जय हे, जय हे, जय हे।
जय जय जय जय हे ॥ ३ ॥

BVBK-0404553

